# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/9000 /२०२४

पुणे दिनांक - 6 /०३/२०२४

पुणे शहर येरवडा वाहतुक विभागाअंतर्गत दिनांक ०८/०३/२०२४ रोजी तारकेश्वर मंदिर येथे महाशिवरात्री निमीत्त मोठ्या प्रमाणात भाविक देवदर्शनासाठी येत असल्याने पुणे शहरात वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहीदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, पुणे शहरातील पर्णकुटी चोक येथील वाहतुकीमध्ये आवश्यकते प्रमाणे तात्पुरते स्वरुपात खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

- **कोरेगाव पार्क बंडगार्डन कडुन येणारी वाहतुक बंद करण्यात येत आहे.**

पर्यायी मार्ग :-

- ➢ पुण्याकडुन नगररोड एअरपोर्ट कडे जाणारी वाहनांना तारकेश्वर चौकातुन डावीकडे वळुन शादलबाबा चौकातुन उजवीकडे वळुन आंबेडकर चौक येथुन उजवीकडे वळुन नगररोड व एअरपोर्ट जातील.

- **संगमवाडी कडुन कोरेगाव पार्क व नगररोडकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येत आहे.**

पर्यायी मार्ग :-

- ➢ संगमवाडी कडुन येणारी वाहतुक ही नगर रोड व कोरेगाव पार्क कडे जाणारी वाहने ही शादलबाबा चौकातुन सरळ आंबेडकर चौकातुन सरळ नगररोड व उजवीकडे वळुन गुंजन चौकातुन उजवीकडे वळुन पर्णकुटी चौकातुन कोरेगाव पार्ककडे जातील.

- **चंद्रमा चौकाकडुन नगर रोडकडे व कोरेगाव पार्ककडे येणारी वाहतुक बंद करण्यात येत आहे.**

पर्यायी मार्ग :-

- ➢ खडकीकडुन येणारी वाहने ही चंद्रमा चौकातुन नगररोड किंवा कोरेगाव पार्क या ठिकाणी जाणारी वाहने ही चंद्रमा चौकातुन डावीकडे वळुन आळंदी जंक्शन, सरळ आंबेडकर चौकातुन, सरळ गोल्फ क्लब चौक, सरळ नगर रोड व कोरेगाव पार्ककडे जाणारी वाहने ही गुंजन चौकातुन उजवीकडे वळुन पर्णकुटी चौकातुन कोरेगाव पार्ककडे जातील.

(रोहीदास पवार)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रत:- सर्व संबंधीतांना